# मँग्रोव्हज नैसर्गिक पार्क हाच गोदरेजचा निर्यातमंत्र



मंगल गोगटे

मुंबई, दि. २० - विक्रोळी येथील खारफुटीचं मँग्रोव्हज पार्क हे मुंबईतील सर्वात मोठं नैसर्गिक पार्क आहे. सुनाबाई फिरोजशा गोदरेज मरीन इकॉलॉजी सेंटरच्या अखत्यारितील हे पार्क गोदरेजचा निर्यातमंत्र ठरला आहे.

नौरोजी फिरोजशा यांनी १९४० मध्ये चार हजार एकर जमीन एका सरकारी लिलावात खरेदी केली होती. त्यापैकी १९५० एकर जमीन आज खारफुटीखाली आहे. ही जागा हरितपट्टा म्हणून घोषित करण्यात आली आहे. पर्यावरणाचं महत्त्व लक्षात घेऊन १९८५ मध्ये मँग्रोव्हज सेंटरच्या माध्यमातून पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली, डॉ. सेठना आणि डॉ. गांगुली यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प सुरू झाला. विशेष म्हणजे यासंबंधी कायदा नसतानाही त्यावेळी पर्यावरणाला महत्त्व दिलं गेलं. फिनलंडच्या वर्ल्ड वाइल्ड फंडचे सेक्रेटरी जनरल रॉनकारी यांनी या मॅंग्रोव्हज पार्कला भेट दिली आणि मँग्रोव्हज पार्कची काळजी घेणाऱ्या गोदरेजच्या सेंटरचे कौतुक केले.

या नैसर्गिक पार्कची काळजी घेतल्यामुळेच खारफुटीचे आणि त्यासंबंधीचे १४ प्रकार आढळले आहेत. तसेच विविध प्रकारचे जीववैविध्य दाखविणारे प्राणीही आढळले आहेत. यात २० प्रकारचे मासे, पंधरा प्रकारची खेकडी, सात प्रकारची कोलंबी, विविध प्रकारचे कासवं, २०५ प्रकारचे पक्षी, ३३ प्रकारचे सस्तन प्राणी, ६० प्रकारची फुलपाखरे, जंगली मांजरे, कोल्हे, जंगली डुकरे, मुंगसे, अजगर समुद्री गरुड, फ्लेमिंग आदी प्रकारचे पक्षीही या पार्कमध्ये आढळले आहेत. आता हे नैसर्गिक पार्क गोदरेजचा निर्यातमंत्र झाला आहे. मंगलवन स्पीड बोट आणि डॉग स्कॉडच्या मदतीने खारेफुटीच्या संरक्षणाची व्यवस्था करण्यात आली असून कोळीसमाज आणि स्थानिक रहिवाशीही या पार्कच्या रक्षणासाठी आता पुढे आला आहे. निर्यातीसाठी या नैसर्गिक प्रकल्पाचे महत्त्व आता जगभर वाढत आहे.